२०१२-२०१३

# महाराष्ट्र राज्य
# मानवी हक्क आयोग



## १२ वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २०१२ -३१ मार्च २०१३

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## १२ वा वार्षिक अहवाल

## (१ एप्रिल २०१२ — ३१ मार्च २०१३)

## अनुक्रमणिका

**प्रस्तावना**


| | | |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | १ |
| २. | आयोगास प्राप्त झालेली प्रकरणे | २ |
| ३. | मानवी हक्कांचे शिक्षण व संवर्धनासाठी प्रोत्साहन | ४ |
| ४. | अर्थ व वित्त पुरवठा | ५ |
| ५. | मानवी हक्कांचे महत्त्व आणि संकल्पना | ६ |


(शा.म.मु.) वाय २१८९-२(१०००—१-२०१५)

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी : २२०३ ४२३३ • फॅक्स : २२०९ १८०४


## प्रस्तावना

या वार्षिक अहवाल काळात महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगात मा. अध्यक्ष आणि सदस्याची पदे रिक्त होती. त्यामुळेच या अहवाल वर्षात आयोगात कोणत्याही प्रलंबित अथवा प्राप्त झालेल्या तक्रारींचा निर्णय दिला गेला नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुरुप डी. के. बसू प्रकरणात दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे अंमलबजावणीकरिता कोणत्याही पोलीस स्टेशन अथवा तुरुंगाला भेट देण्यात आली नाही.

आज रोजी आयोगात कार्यरत असलेले मा. अध्यक्ष आणि सदस्य यांनी सप्टेंबर, २०१३ मध्ये कार्यभार स्वीकारला, त्यानंतर पूर्वीच्या वर्षांचे प्रलंबित असलेल्या वार्षिक अहवालांचे कार्य प्राधान्यक्रमाने घेऊन ते आता सादर करण्यात येत आहे.

आतापर्यंत २००७-०८ ते २०१२-१३ पर्यंतचे वार्षिक अहवाल तयार करून तत्कालीन सचिव श्री. मफिउल हुसेन यांनी सरकारकडे सादर केले नव्हते. त्याची कारणे त्यांनाच माहिती असू शकतील. त्यानंतर नवीन अध्यक्ष आल्यानंतर पूर्वीच्या वर्षांचे प्रलंबित असलेल्या वार्षिक अहवालांचे कार्य प्राधान्यक्रमाने घेऊन ते आता सादर करण्यात येत आहे.

**श्री. भगवंतराव डी. मोरे,**
सदस्य.

**न्यायमूर्ती श्री. एस. आर. बन्नूरमठ,**
अध्यक्ष.

स्थळ : मुंबई,

दिनांक :

प्रकरण एक

**प्रास्ताविक :**

१.१ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा हा बारावा वार्षिक अहवाल आहे, त्याचा कालखंड हा १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ या काळाकरिता आहे. मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना दिनांक ६ मार्च २००१ रोजी केली.

**आयोगाची रचना :**

मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ चे तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगात अध्यक्ष आणि दोन सदस्य यांचा समावेश होतो.

१.२ मा. सदस्य श्री. टि. सिंगारवेल हे दिनांक २५ ऑक्टोबर २०११ रोजी सेवानिवृत्त झाले. मा. अध्यक्ष, न्यायमूर्ती क्षितिज आर. व्यास यांनी दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ रोजी राजीनामा दिला. मा. सदस्य न्यायमूर्ती श्री. व्ही. जी. मुनशी हे दिनांक १९ फेब्रुवारी २०१२ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगात कोणीही अध्यक्ष आणि सदस्य हे कार्यरत नव्हते; आणि पदेही रिक्त होती.

१.३ आयोगाचे सचिव श्री. मफिउल हुसेन यांनी या अहवाल वर्षात आयोगाचे सचिव म्हणून कार्य केले.

## प्रकरण दोन

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगास प्राप्त प्रकरणे :**

२.१ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगात दिनांक ११ मार्च २०१३ पर्यंत प्राप्त झालेल्या तक्रारीची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे :—

| वर्ष | पूर्वीची प्रलंबित प्रकरणे. | नवीन प्राप्त प्रकरणे. | वर्षाची एकूण प्रकरणे. | प्रथमदर्शनी निकाली प्रकरणे. | अहवाल प्राप्त होऊन निकाली प्रकरणे. | वर्षात एकूण निकाली प्रकरणे. | वर्ष अखेर प्रलंबित प्रकरणे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | ४९४७ | ५६८० | १०६२७ | निरंक | निरंक | निरंक | १०६२७ |

चालू वर्षात आयोगात एकूण ५६८० नवीन प्रकरणे प्राप्त झालीत.

**२.२ तक्रारीचे स्वरूप :**

१. पोलीस विभागाविरुद्ध तक्रारी : ह्या तक्रारीमध्ये मुख्यतः पोलिसांकडून अधिकाराचा दुरुपयोग, तक्रार नोंदण्यास नकार, खोट्या प्रकरणात अडकविणे, बेकायदेशीर कोठडीत ठेवणे, भ्रष्टाचार इ. चा समावेश होतो. (१९४५)

२. शासकीय विभागाविरुद्ध तक्रारी : ह्या तक्रारीमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती इ. प्रकारच्या तक्रारींचा समावेश होतो. (५३०)

३. तुरुंगाविरुद्ध तक्रारी ... ... ... ... ... (०७)

४. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विरुद्ध तक्रारी -... ... ... ... (०६)

५. महाराष्ट्र गृहनिर्माण विभागाविरुद्ध तक्रारी - ... ... ... ... (०१)

६. नोकरीविषयक तक्रारी ... ... ... ... ... (३९९)

७. कुटुंबविषयक तक्रारी ... ... ... ... ... (२३३)

८. खाजगी बाबतीत तक्रारी... ... ... ... ... (१३१८)

९. दिवाणी वादविषयी तक्रारी ... ... ... ... (१०२)

१०. जमीनविषयक तक्रारी ... ... ... ... ... (१२२)


११. मालमत्ताविषयक तक्रारी... ... ... ... ... (५३)

१२. बँका विरुद्ध तक्रारी ... ... ... ... ... (०३)

१३. वैद्यकीयविषयक तक्रारी... ... ... ... ... (०२)

१४. संकीर्ण तक्रारी ... ... ... ... ... (९५९)

**तक्रारींच्या प्रकारांचे विभाजन आलेखाद्वारे खालीलप्रमाणे केले आहे :—**




**२.३ कोठडीतील मृत्यूविषयक प्रकरणे :—**

आयोगाला या वर्षी वेगवेगळ्या प्राधिकरणांकडून एकुण २६९ कोठडीतील मृत्यूविषयक सूचना प्राप्त झाल्या. त्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे :—

१. पोलीस कोठडीतील मृत्यू - १८

२. तुरुंगातील मृत्यू - ८०

३. पोलीस चकमकीतील मृत्यू - ०१

४. भिक्षेकरी गृहातील मृत्यू - ६४

५. बालगृहातील मृत्यू - ८८

६. महिलागृहातील मृत्यू - ०८

७. मतिमंद मुलांचे गृहातील मृत्यू - १०

प्रकरण तीन

**मानवी हक्कांचे शिक्षण व संवर्धनासाठी प्रोत्साहन :—**

३.१ मानवी हक्कांचे शिक्षण व संवर्धनासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोगाचे सचिव, श्री. मफिउल हुसेन यांनी खालील प्रकारचे कार्यक्रम आयोजित केलेत :—

**१. मानवी हक्क दिवस.—**

दिनांक १० डिसेंबर २०१२ रोजी जागतिक मानवी हक्क दिनाच्या निमित्ताने आयोगाच्या आवारात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या कार्यक्रमात निष्णांत वक्ते न्यायमूर्ती श्री. एस. बी. म्हसे, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई, श्री. सुधीर ठाकरे, अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई, फादर डॉ. फ्रेजर मॅस्करहॅन्स, प्राचार्य, सेंट झेवियर्स कॉलेज, मुंबई इत्यादी वक्त्यांनी मानवी हक्काच्या उल्लंघनाबद्दल भाषण केले, विशेषतः महिलांबाबत होणाऱ्या उल्लंघनांची चर्चा झाली.

**२. मानवी हक्क प्रसार कार्यक्रम.—**

दिनांक २१ आणि २२ फेब्रुवारी २०१३ रोजी न्युझिलंड हॉस्टेल, मुंबई येथे दोन दिवसांकरिता विद्यार्थ्यांमध्ये मानवी हक्क शिक्षणाचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमासाठी चार महिने अगोदर महाराष्ट्रातील विधी आणि समाजशास्त्र महाविद्यालयांना प्रश्नावली आणि साहित्य पुरविण्यात आले. याचा मुख्य उद्देश असा होतो की कार्यक्रमात सहभागी होणाऱ्यांनी त्यांच्या भागात मानवी हक्कविषयक साक्षरतेचा प्रसार करून त्यांचे मानवी हक्कभंगांविषयी अनुभव सादर करता येतील. या कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रातून ९५ विद्यार्थ्यांनी आणि २५ विधी आणि समाजशास्त्र महाविद्यालयांनी सहभाग घेतला.

**३. श्री. मफिउल हुसेन यांनी सहभाग घेतलेले प्रसार कार्यक्रम/भाषण आणि भेटीबाबत.—**

१. एस. एन. डी. टी. विद्यापिठाने दिनांक १० डिसेंबर २०१२ रोजी मानवी हक्क ' महिला आणि दुर्लक्षित घटक ' याविषयात मुख्य वक्ता म्हणून हजर राहिले.

२. दिनांक २ फेब्रुवारी २०१३ रोजी मुंबई विद्यापिठाच्या एनएसएस कॅम्पातील व्हिवा ट्रस्टने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थिती.

३. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे बैठकीत दिल्ली येथे दिनांक २७ जुलै २०१२ रोजी आयोगाचे प्रतिनिधीत्व केले.

४. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे दिनांक १४ डिसेंबर २०१२ रोजी मानवी हक्क शिक्षण या विषयावर आयोजित केलेल्या चर्चासत्रात सहभाग घेतला.

५. दिनांक ३ जानेवारी २०१३ रोजी नवी दिल्ली येथे अशासकीय संस्थांनी कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमास हजेरी.

६. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने ४ जानेवारी २०१३ रोजी अन्न हक्क विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थिती.

७. दिनांक २८ जानेवारी २०१३ रोजी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने नागपूर येथे अनुसूचित जातीवरील अत्यांचारासंदर्भात आयोजित केलेल्या खुल्या सुनावणीस हजर राहिले.

८. दिनांक ७ जून २०१२ रोजी नागपूर पोलीस आयुक्त कार्यालयास भेट दिली आणि मानवी हक्कांच्या विषयाअनुरूप राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापिठाच्या उप कुलगुरुंना भेट दिली.

## प्रकरण चार

**अर्थ व वित्त पुरवठा.—**

४.१ यावर्षी आयोगास महाराष्ट्र शासनाकडून एकूण अनुदान २ करोड ३५ लाख ४६ हजार रुपये प्राप्त झाले. त्यापैकी आयोगाने रुपये १ करोड ९५ लाख ९२ हजार १५५ रुपये खर्च केले. उर्वरित रक्कम रुपये ३९ लाख ५३ हजार ८४५ हे शासनाच्या तिजोरीत परत करण्यात आले.

## प्रकरण पाच

**मानवी हक्कांचे महत्त्व आणि संकल्पना.—**

१. मानवी हक्क आयोग ही एक संविधानिक संरचना असून त्याची स्थापना मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ च्या कलम २२ च्या तरतुदीनुसार दिनांक ६ मार्च २००१ रोजी झाली. आयोगाच्या स्थापनेपासूनच आयोग हा नागरिकांच्या मानवी हक्काचे संरक्षणासाठी उत्थान आणि प्रयत्न करीत आहे.

२. मानवी हक्क हे मानवाचे अविभाज्य हक्क असून तो मनुष्यप्राणी असल्यामुळे त्याला ते जन्मतः प्राप्त झाले आहे. मानवी हक्क हे व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य आणि सन्मानाशी निगडीत आहेत. या हक्कांपैकी अनेक हक्कांची ग्वाही भारतीय राज्य घटना देते तसेच न्यायालयामार्फत त्यांची अंमलबजावणी केली जाऊ शकते.

३. मानवी हक्कांच्या संकल्पनेचा उगमाचा शोध घेतला असता ती आपणास इ.स. १२१५ च्या मॅग्ना कार्टा सनदीमध्ये, इंग्लिश बील ऑफ राईटस, १६८९ आणि मानवांचे आणि नागरिकांच्या हक्कांच्या जाहिरनाम्यामध्ये आढळते.

४. परंतु दुसऱ्या जागतिक महायुद्धामध्ये झालेल्या अत्याचार आणि नरसंहार आणि युद्धामुळे झालेले प्रचंड नुकसानीचा राष्ट्रांनी अनुभव घेतला. ज्या सर्वांचा अंतिम परिणाम म्हणून १९४५ साली जागतिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्याचा स्वीकार करण्यात आला.

५. भारतीय राज्यघटनेने एक भाग संपूर्णपणे मुलभूत हक्कांसाठी सर्मपित केलेला आहे आणि मानवी हक्क आयोग हे संविधानिकरित्या यासाठी कार्य करीत आहे.

६. या कायद्याचे मुळतत्त्व ' पॅरिस प्रिन्सिपल्स ' म्हणून पॅरिसमध्ये १९९१ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघ आणि त्याचे सदस्य राष्ट्रांच्या मिटींगमध्ये दिनांक ३ मार्च १९९२ मध्ये तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत २० डिसेंबर १९९३ रोजी संमत झाले.

७. आयोग हा शासकीय सेवेकांकडून होणाऱ्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाला प्रतिबंध करीत आहे. हा उदात्त दृष्टिकोन असून तो प्रतिबंध, संरक्षण, प्रोत्साहन या तीन तत्त्वांवर आधारलेला आहे.

८. आयोग हा शासकीय सेवकांमार्फत होणाऱ्या मानवी हक्क उल्लंघनामुळे किंवा त्याविषयी दाखविलेल्या निष्काळजीपणाच्या परिस्थितीत लोकांना मदत करीत आहे.

आयोग हा आपल्या अधिकारांचा परिणामकारक रितीने वापरून मानवी हक्कांचे उल्लंघनाबाबत स्वतःहून चौकशी करू शकतो, किंवा बळित व्यक्तीने स्वतः अथवा त्याचेवतीने प्रतिनिधी म्हणून कोणत्याही व्यक्तीने याचिका केली असेल तर त्याची चौकशी करणे अथवा कोणत्याही न्यायालयापुढे मानवी हक्क भंगाबाबत एखादे प्रकरण प्रलंबित असेल तर त्यात न्यायालयाचे परवानगीने भाग घेऊन, तुरुंग किंवा शासनाच्या कोणत्याही यंत्रणेद्वारा व्यक्तीला उपचार, सुधारणा अथवा संरक्षणाच्या दृष्टीने ताब्यात ठेवलेले असेल तेथे भेट देणे आणि बंधित व्यक्तीच्या जीवनमानाचा अभ्यास व निरीक्षण करून त्या उंचावण्याबाबत शिफारशी करणे, तसेच मानवी हक्क साक्षरता बाबत समाजाच्या सर्व स्तरावर जाणीव निर्माण करणे आणि हक्क रक्षणासंबंधीच्या तरतुदीची प्रकाशने, माध्यमे, चर्चासत्र आणि इतर उपलब्ध माध्यमातून प्रसार व प्रचार करणे.

९. आयोग हा लोकांच्या अपेक्षांनुरुप जबाबदा-या पार पाडण्यासाठी वेगवेगळी कार्य करू शकतो. उदा.

- कोठडीत होणारी हिंसा, बलात्कार, छळ आणि मृत्यू या प्रकारच्या घटनांना प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करू शकतो.
- तसेच पोलीस कोठडी, तुरुंग आणि इतर बंदी ठेवण्याच्या जागांमध्ये सुधारणा सुचवू शकतो.

१०. आयोगावर एक अध्यक्ष आणि दोन सदस्यांचा समावेश असतो.

- अध्यक्ष - आयोगाचे अध्यक्ष हे उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश असायला हवेत.
- एक सदस्य हे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा राज्यातील जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश असावेत आणि त्यांचा जिल्हा न्यायाधीश म्हणून कमीत कमी ७ वर्षांचा अनुभव असावा.
- एक सदस्याची नियुक्ती ही मानवी हक्कांशी निगडीत असलेले ज्ञान किंवा त्याबाबत व्यवहारीक अनुभव असलेल्या व्यक्तींमधून व्हायला हवी.

११. आयोग हा कार्यालयीन उद्देशाने खालील प्रकारच्या विभागात विभागण्यात आला :—

- प्रशासन विभाग
- लेखा विभाग
- अन्वेषण विभाग
- विधी विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई